# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०३/२०२४ (बुधवार) सायंकाळ**

---

### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक १२/०३/२०२४ रोजी पोलीस स्टेशन नरखेड येथील स्टाफ पोस्टे नरखेड हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, मौजा बेलोना ते उमरीकला रोड येथे अवैधरित्या विनापरवाना रेती (वाळू) ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये लोड करून वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून मौजा बेलोना ते उमरीकला रोड येथे नाकाबंदी करीत असताना ट्रॅक्टर क्र. एम. एच.— २७/एल ३६१९ आढळुन आली. स्टाफने वाहनास थांबवून पाहणी केली असता वाहनामध्ये १०० फुट रेती मिळून आल्याने सदर ट्रॅक्टर चालक **आरोपी नामे— जानु दौलत कोडापे, रा. उमरी कला** यास ट्रॅक्टर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीच्या ताब्यातून ट्रॅक्टर क्र. एम. एच— २७/एल— ३६१९ मध्ये १०० फुट रेती किंमती ३०००/— रू ट्रॅक्टर मुंडा किंमती ४०००००/—रू. व ट्रॉली किंमती १०००००/— असा एकुण ५०३०००/— रू. चा मुददेमाल जप्त करून आरोपीविरूद्ध पोस्टे नरखेड येथे अप क्र. १५४/२०२४ कलम ३७९ भा.दं.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. भिवापूर येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे नरखेड येथील ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक कृष्णा तिवारी, पोलीस हवालदार कुणाल अरगुडे, गजानन तितरे, स्वप्नील बोंडे, केवल आडे, गणेश ताजने, जालींदर रोठोड, होमगार्ड महेश तांबोळी यांनी केली.

# अवैधरीत्या धारदार शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक

दिनांक १२/०३/२०२४ ला पोलीस स्टेशन खापरखेडा परिसरात पेट्रोलींग, प्रोव्हीबिशन जुगार रेड कामी फिरत असतांना गुप्त बातमीदाराव्दारे माहीती दिली की, खापरखेडा रेल्वे चौकीजवळ असलेल्या भाईजान टी स्टॉल चे मागील बाजूस एक इसम माउझर बाळगुन आहे अशा खबरेवरून डी. बी पथक स्टॉप खापरखेडा रेल्वे चौकीजवळ असलेल्या भाईजान टी स्टॉल जवळ जावून कार्यवाही केली असता शाहरुख अत्ताऊल्ला पठाण वय ३१ वर्ष रा. बाजार चौक पारशिवनी हा सार्वजनिक ठिकाणी एक लोखंडी देशी माउझर (अग्निशस्त्र) ज्यास लोखंडी मॅग्झीन लागलेली बाळगुन मिळून आला त्या ताब्यात घेऊन विचारपुस केली असता त्याने सांगितले की, २५ ते ३० दिवसापूर्वी सुरज कावळे यांचेकडून ४०,०००/— रुपयात विकत घेतलेली असल्याचे सांगितल्याने त्यास अटक करून त्याचेकडुन माउझर जप्त करून पो.स्टे खापरखेडा अप. क्र. १४४/२४ कलम ३/२५, ५/२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंद असुन तपासात आहे आरोपी सुरज कावळे हा फरार असुन त्याचा शोध सुरु आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, उपविभागिय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान संतोष गायकवाड सा. यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार धनाजी जळक सा. पोउपनि भारती नरोटे, डी. बी पथक येथील पोलीस हवालदार प्रफुल राठोड, शैलेश यादव, पोलीस नायक राजु भोयर, मुकेश वाघाडे, राजकुमार सातुर महिला पोलीस नायक कविता गोंडाने यांचे पथकाने पार पाडली आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर